**महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या कामासाठी पदांच्या सुधारीत आकृतिबंधानुसार विभागीय आयुक्त कार्यालयातील लेखाधिकारी यांना "आहरण व संवितरण अधिकारी" घोषित करण्याबाबत.....**

**महाराष्ट्र शासन**

नियोजन विभाग (रोहयो)

शासन निर्णय क्रमांक: आस्थाप-२०१३/प्र.क्र. ६/मग्रारो-३

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

दिनांक : २० फेब्रुवारी, २०१३

**वाचा:-** १) शासन निर्णय, नियोजन विभाग क्र. मग्रारो-२००८/प्र.क्र. १६८/मग्रारो-३, दि. ८/६/२०१०.
२) शासन निर्णय, नियोजन विभाग क्र. मग्रारो-२००८/प्र.क्र. १६८/मग्रारो-३, दि. १९/७/२०१०.
३) शासन निर्णय, नियोजन विभाग क्र. आकृति-२०११/प्र.क्र. ५/मग्रारो-३, दि. ३१/५/२०११.
४) शासन निर्णय, नियोजन विभाग क्र. रोहयो-२००९/प्र.क्र. १२०/मग्रारो-३, दि. २५/१०/२०११.

**प्रस्तावना :-**

राज्यात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, जिल्हा परिषद व तालुका स्तरावरील पदांचा आढावा घेण्यात आला. सदर आढाव्यात वित्त विभागाने गठीत केलेल्या उच्चाधिकार समितीने मान्यता दिल्यानंतर शासन निर्णय, नियोजन विभाग क्र. आकृति-२०११/प्र.क्र. ५/मग्रारो-३, दि.३१/५/२०११ अन्वये पदांचा सुधारीत आकृतिबंध मंजूर करण्यात आला आहे. सुधारीत आकृतिबंधानुसार विभागीय आयुक्त कार्यालयासाठी एकूण २८ पदे मंजूर करण्यात आली आहेत. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत दैनंदिन कामामध्ये सुसूत्रितपणा व सुलभ अंमलबजावणीसाठी उपायुक्त (रोहयो) यांना शासन निर्णय, नियोजन विभाग क्र. रोहयो-२००९/प्र.क्र. १२०/मग्रारो-३, दि. २५/१०/२०११ अन्वये **"विभाग प्रमुख"** म्हणून घोषित करण्यात आले आहे. आता पदांच्या सुधारीत आकृतिबंधानुसार विभागीय आयुक्त कार्यालयातील लेखाधिकारी यांना **"आहरण व संवितरण अधिकारी"** घोषित करण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता. याबाबत शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय :**

राज्यात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेचे काम सुलभतेने पार पाडण्यासाठी या शासन निर्णयान्वये विभागीय आयुक्त कार्यालयातील लेखाधिकारी यांना **"आहरण व संवितरण अधिकारी"** म्हणून घोषित करण्यात येत असून, त्यांना सदर पदाचे अधिकार प्रदान करण्यात येत आहेत.

२. हे आदेश, महाराष्ट्र कोषागार नियम १९६८, खंड-१ मधील अ.क्र. १५६ नुसार विभागांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये व वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. ४१/१३/कोषाप्र-५, दिनांक ७.२.२०१३ अन्वये त्या विभागाने दिलेल्या मान्यतेनुसार काढण्यात येत आहेत.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र राज्याच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०१३०२२०१२१०४७८५१६ असा आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,**

**( प्रशांत र. पिंपळे )**
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१. मा. मंत्री (रोहयो) यांचे खाजगी सचिव
२. मा. राज्यमंत्री (रोहयो) यांचे खाजगी सचिव
३. प्रधान सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२.
४. प्रधान सचिव (लेखा व कोषागारे), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२.
५. प्रधान सचिव (रोहयो), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२.
६. प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई.
७. प्रधान महालेखापाल (लेखा परीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई.
८. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर.
९. महालेखापाल (लेखा परीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर.
१०. सर्व विभागीय आयुक्त
११. सर्व जिल्हाधिकारी (मुंबई शहर व उपनगर वगळून)
१२. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.
१३. सर्व उप आयुक्त (रोहयो), विभागीय आयुक्त कार्यालय.
१४. संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१५. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
१६. सर्व उपजिल्हाधिकारी (रोहयो), जिल्हाधिकारी कार्यालय (मुंबई शहर व उपनगर वगळून).
१७. उप सचिव (रोहयो) यांचे स्वीय सहाय्यक, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२.
१८. सर्व अवर सचिव व कक्ष अधिकारी (रोहयो प्रभाग), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२.
१९. सार संग्रहार्थ, कक्ष अधिकारी, मग्रारो-१, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२.
२०. निवडनस्ती, मग्रारो-३, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२.